|| सा विद्या या विमुक्तये ||

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

**"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431 606 (Maharashtra)**

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++'grade

आज़ादी का अमृत महोत्सव

## MEETING & ELECTION SECTION

| Phone : (02462) 215246<br>Fax : (02462) 215572 | Website:<br>Srtmun.ac.in | E-Mail :<br>election@srtmun.ac.in |
|---|---|---|

## निवडणूक सूचना

संदर्भ : **Notification No. SRTMUN/Election/2022-2023/337 Dated 28/09/2022**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम 40(2)(c) मधील तरतुदी नुसार व महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ अन्वये प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठीच्या विहीत केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणारे व प्रस्तुत विद्यापीठाचे Direction No. 01/2022 Ref. No. Election/BOS/Order/2022-2023/223, dt. 19th August, 2022 **नुसार प्रत्येक अभ्यासमंडळाचे तीन विभाग प्रमुख अभ्यासमंडळावर** निवडून देण्यासाठी ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.

मतदान एकल संक्रमणिय पसंतीक्रम (Single Transferable Vote) पध्दतीनुसार व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार–ब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसुचनेत नमुद एकरूप परिनियम क्रमांक १ नुसार दिलेल्या तरतुदीप्रमाणे निश्चित केलेल्या मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

मतदार संघातील प्रत्येक अभ्यासमंडळासाठी मतपत्रिका वेगवेगळी असेल. मतदान सामायिक (in common) असेल. **विभागप्रमुखांच्या अंतिम मतदार यादीत** समाविष्ट असलेल्या मतदारांनाच निवडणुकीत भाग घेता येईल.

**परिनियमातील तरतुदीनुसार व वरील संदर्भिय अधिसूचनेतील दिनांक २०/१०/२०२२ पर्यंत पुर्ण झालेल्या प्रक्रिया कायम ठेवून निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र | विवरण | तारीख व वेळ |
|---|---|---|
| ०१. | नामनिर्देशन पत्र भरण्याचा दिनांक व वेळ | दिनांक ३१ ऑक्टोबर ते दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन दिवशी |
| ०२. | नामनिर्देशन पत्र छाननीचा दिनांक | दिनांक ०४ व ०५ नोव्हेंबर, २०२२ |
| ०३. | वैध व अवैध नामनिर्देशनपत्र यादी प्रसिध्द करणे | दिनांक ०७ नोव्हेंबर, २०२२ |
| ०४. | मा. कुलगुरू महोदयांकडे नामनिर्देशनपत्रा संदर्भातील अपिल सादर करणे | दिनांक ०९ व १० नोव्हेंबर, २०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत |
| ०५. | मा. कुलगुरू महोदयांचा अपिला वरील निर्णय | दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२ |
| ०६. | नामनिर्देशन पत्र परत घेण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १४ ते १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन दिवशी |
| ०७. | निवडणुकीसाठी पात्र उमेदवाराची यादी जाहीर | दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ |
| ०८. | मतदानाचा दिनांक व वेळ | रविवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२२ सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत |
| ०९. | मतमोजणी व निकालाचा दिनांक व वेळ | मंगळवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ सकाळी १०.०० पासून |

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार–ब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक २८ एप्रिल, २०१७ अधिसूचना अन्वये अभ्यासमंडळावर तीन विभाग प्रमुख निवडून देण्यासाठी विहित केलेल्या पात्रता शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

a) Shall possess Ph.D. Degree, unless he is a Principal appointed as a Principal before 13th October, 2000,

b) Shall have at least ten years teaching experience at undergraduate level in aggregate

c) Shall have undertaken university examination related work for at least five years in aggregate.

वरील पात्रता शर्तीच्या ग्राहयतेबाबत खालीलप्रमाणे कागदपत्रे Attested/Self attested करून नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

1. Approval letter of University
2. Appointment letter as a HOD
3. Ph.D. Degree Certificate (Unless appointed as Principal before 13.10.2000)
4. Teaching Experience Certificate [It should be at least ten years in aggregate]
5. Certificate from the Director, Board of Examination and Evaluation about undertaking university examination related work. [It should be at least five years in aggregate]
6. Necessary proof, if name is changed
7. Receipt of prescribed nomination fee of Rs. 100/- paid to the University office

नामनिर्देशनपत्र (नॉमिनेशन फॉर्म) विद्यापीठाच्या लेखा विभागात रु. १००/— भरुन विद्यापीठ सभा व निवडणूक विभागातून कार्यालयीन दिवशी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मिळू शकेल.

नामनिर्देशनपत्र (नॉमिनेशन फॉर्म) विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर Link-Election Portal-2022 वर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करून घेता येईल तथापि, याबाबतचे शुल्क रुपये १००/— विद्यापीठाच्या लेखा विभागात भरणा करून त्याची पावती नामनिर्देशन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

* योग्य रीतीने परिपूर्ण भरलेले व वेळेपूर्वी दाखल केलेले नामनिर्देशन अर्ज विचारात घेतले जातील.
* उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर जर वैध नामनिर्देशनाची संख्या, भरावयाच्या रिक्त जागांच्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याच्या दिनांकास **नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांना** निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल.
* उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील, तर अशा उमेदवारांची अंतिम यादी (Valid Nominations) जाहीर करण्यात येईल. सदर जागांची निवडणूक **रविवार दिनांक २७ नोव्हेंबर, २०२२** रोजी सकाळी **०८.०० ते ०५.००** या वेळेत निश्चित केलेल्या महाविद्यालयातील मतदान केंद्रावर घेण्यात येईल. मतदाराने मतदान कुठे करावयाचे आहे, याबाबत मतदान केंद्राची माहिती विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर Link-Election Portal-2022 वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

नामनिर्देशन फॉर्मची छाननी व मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी लेखी पत्राद्वारे योग्य पध्दतीने प्राधिकृत करण्यात आलेली अंतिम मतदार यादीतील अधिकृत केलेला त्याचा प्रतिनिधी हजर राहू शकेल.

उमेदवारास उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास उमेदवारास विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५.०० वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या सभा व निवडणूक विभागात व्यक्तिशः किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा विहित नमुन्यातील (Withdrawal form) अर्ज सादर करावा लागेल.

उमेदवाराने आपल्या सहीनिशी उमेदवारी परत घेण्यासंबंधीचा अर्ज कुलसचिवांना करणे अनिवार्य आहे. सदरील अर्जावरील उमेदवाराची सही व इतर महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा मान्यता परिसंस्थाचे संचालक किंवा विद्यापीठातील शैक्षणिक संकुलाचे संचालक यापैकी एकाने साक्षांकित केलेली असावी, अन्यथा उमेदवारी परत घेण्यासंबंधीच्या अर्जावर विचार केला जाणार नाही.

प्रत्येक अभ्यासमंडळाची मतदार यादी रुपये १५०/— विद्यापीठाच्या लेखा विभागात भरुन विद्यापीठाच्या सभा व निवडणूक विभागातून प्राप्त करता येईल.

मतदाराने मतदानासाठी जाताना नियोक्त्याने दिलेले ओळखपत्र, आधार कार्ड, निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र, पारपत्र, वाहन चालविण्याचा फोटो असलेला परवाना यापैकी एक सोबत आणावे.
वरील पैकी एक ओळखीबाबत पुरावा मतदान केंद्रावर निवडणूक अधिकाऱ्यांना दाखविल्याशिवाय मतपत्रिका मिळणार नाही.

**कुलसचिव**
**तथा निवडणूक निर्णय अधिकारी**

जा. क्रं. स्वारातीमवि/निवडणूक/वि.प्र./२०२२—२३/467
दिनांक : २१/१०/२०२२